**नियमित दिवाणी दावा क्र.** - ६/२०१८

दिलिप कोंडाजी शिंदे व इतर . . . वादी

**विरूध्द**

शांताराम रामकृष्ण शिंदे व इतर . . . प्रतिवादी

**निशाणी क्र. ५ वरील आदेश**

(घोषित दिनांक - ०२/०५/२०१८)

१. सदरच्या प्रकरणात दोन्ही पक्षकारांचे युक्तीवाद दि. २४/०४/२०१८ रोजी संपल्यानंतर दि. २७/०४/२०१८ रोजीदेखील वादीतर्फे महाशय उच्च न्यायालयांचे न्यायनिर्णय दाखल करण्यात आलेले आहेत. स्वाभाविकच त्यावर प्रतिवादींनादेखील त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देणे आवश्यक असल्यामुळे व त्यादिवशी अन्य कामांमूळे पुरेसा वेळ नसल्यामुळे आदेश करण्यास पुरेसा वेळ मिळाला नाही. त्यामुळे सदर निशाणी क्र. ५ वरील आदेश उन्हाळी सुट्‌टीच्या कालावधीत दि. ०२/०५/२०१८ रोजी करण्यात येईल असा आदेश निशाणी क्र. १ वर करण्यात आलेला आहे.

२. वादीने सदर दावा हा वहिवाट केस क्र. - २६/२०१६ व आरटीएस वहिवाट रिव्हीजन अर्ज क्र. ३०/२०१७ मध्ये दिलेला निकाल त्याच्यावर बंधनकारक नाही असे घोषित करण्यासाठी दावा दाखल केला असून त्या निकालाद्वारे नव्याने वहिवाट रस्ता निर्माण करू नये व वादीच्या कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करू नये असा निरंतरचा मनाई हूकूम मिळण्यासाठी दावा दाखल केला असून दाव्याच्या निकालापावेतो वाद मिळकतीची कुठल्याही प्रकारे कब्जास हरकत करू म्हणून **निशाणी क्र. ५** अन्वये तुर्तातूर्त मनाई हुकूम मागितलेला आहे.

३. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी निशाणी क्र. ३१ वर सदर अर्जाला व दाव्यास जबाब दिलेला असून वादीचे सर्व कथन नाकरलेले आहेत व सदरचा अर्ज नामंजूर करण्याची मागणी केलेली आहे.

४. अर्ज व म्हणणे यामध्ये आलेल्या कथनांवरुन खालील वादबिंदु विचाराकरिता माझ्यासमोर उपस्थित झाले व त्याची कारणमिमांसा मी पुढीलप्रमाणे देत आहे -

| अ.क्र. | वादबिंदु | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादीने प्रथमदर्शनी केस सिध्द केली आहे काय ? | **नकारार्थी.** |
| २ | न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने जातो काय ? | **नकारार्थी.** |
| ३ | अर्ज नामंजूर केल्यास वादीची अपरिमित अशी हानी होईल काय ? | **नकारार्थी.** |
| ४ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## - कारणमिमांसा -

५. वादी व प्रतिवादींच्या वकिलांचा प्रदिर्घ युक्तीवाद ऐकला.

### वादबिंदु क्र. १ ते ३ करिता -

६. वादीने असे नमुद केले आहे की, गट क्र. १९२३ व १९३२ हे मुळ मयत महादू शिंदे यांच्या वडिलोपार्जित मालकीच्या व कब्जे वहिवाटीच्या होत्या. त्यांना कोंडाजी, नाना, यशवंत अशी चार मुळे होती. ती चारही मुले मयत आहेत. त्यांच्या मिळकतीचे वाटप होवून गट क्र. १९२३ ही कोंडाजी महादू याच्या स्वतंत्र मालकीस आली. तसेच गट क्र. १९३२ ही नाना महादू याच्या वाटणीस आली. तसेच गट क्र. १९३३ ही कोंडाजी व नाना यांच्या सामाईक विहिरीसाठी ठेवण्यात आली होती. कोंडाजी याला भिका, संजय व दिलीप (वादी क्र. १) अशी तीन मुले असून गट क्र. १९२३ पैकी पूर्वेकडील १ हेक्टर ३७ आर ही भिका कोंडाजीच्या वाटणीस गेलेली आहे. तसेच त्याच्या पश्चिमेकडील १ हेक्टर ४१ आर ही वादी क्र. १ च्या हिश्यास आलेली आहे. त्याच्या पश्चिमेकडील ०.३९ आर क्षेत्र हे संजयच्या वाटणीस आलेली आहे. संजयचे क्षेत्र ०.३९आर हे वादी क्र. २ ने खरेदी केलेली आहे. तथापि, भिका याच्या वाटणीस आलेले १.३७आर क्षेत्रापैकी १.१७आर क्षेत्र हे प्रतिवादी क्र. ३ ने दि. ०२/०७/२००१ रोजी खरेदी केले असून ०.२०आर क्षेत्र हे प्रतिवादी क्र. १ ने दि. २५/१०/१९९९ रोजी खरेदी घेतली आहे. शिवाय नानाच्या हिश्यात आलेले क्षेत्र रामकृष्ण नाना यांना आले असून त्यांनी प्रतिवादी क्र. १ व २ यांना सदरचे क्षेत्र वाटणीस दिलेले आहे. त्यामुळे गट क्र. १९३२/१ व १९३२/२ हे प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या नावाने आहेत.

७. पुढे वादीने असे नमुद केले आहे की, प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना वरिल मिळकतीमध्ये जाण्यासाठी व मालाची ने आण करण्यासाठी एक जुना वहिवाटीचा रस्ता असून गट क्र. १९३३, १९३२ व १९२९ च्या उत्तर कोप-याने पुढे जातो, तसेच गट क्र. १९३६, १९४३ व १९२९ याच्या उत्तर बाजूने जाणा-या वायकंडेवाडी रोडला मिळतो. तो वायकंडेवाडी रोड हा शिंदवळ-दोंडगव्हाण रस्त्याला मिळतो. तो रस्ता आजही कायम आहे. तसे असतांनादेखील प्रतिवादींनी महाशय तहसिलदार यांच्याकडे वहिवाट केस क्र. - २६/२०१६ दाखल केले असून गट क्र. १९३२, १९३३ व १९२३ या मिळकतीतून वहिवाट रस्ता दर्शवूण त्याची मागणी केलेली आहे. त्या प्रकरणात वादीने जबाब दाखल केला असून महाशय तहसिलदार यांनी प्रत्यक्ष जागेवर येवून दि. २३/१२/२०१६ रोजी पंचनामा केला असून त्याचा नकाशादेखील बनविला आहे. त्या नकाशातदेखील उपरोक्त नमुद वायकडेंवाडीकडील रस्ता उपलब्ध असल्याचे पंचनाम्यात नमुद केले असून तरीदेखील गट क्र. १९२३ च्या उत्तर बांधाने रस्ता देण्याचा आदेश महाशय तहसिलदार यांनी दि. २९/०३/२०१७ रोजी दिलेला आहे. त्याविरूध्द वादीने महाशय उप-विभागिय अधिकारी यांच्या न्यायालयात रिव्हीजन अर्ज क्र. ३०/२०१७ दाखल केला असून त्यांनीदेखील तो आदेश कायम केलेला आहे. प्रत्यक्षात गट क्र. १९२३ च्या उत्तर दिशेने कुठलाही वहिवाट अथवा रस्ता नसतांना तसा आदेश करण्यात आलेला आहे. त्या जागेवर वादीने घर बांधले असून सदर जागेवर त्यांची विहिर देखील आहे. त्यामुळे तो आदेश वादीवर बंधनकारक नसल्याचे घोषित करण्यासाठी सदरचा दावा दाखल केला असून तोपावेतो प्रतिवादींनी त्या आदेशाअन्वये वादिच्या कब्जे वहिवाटीस हरकत करून नये अथवा नव्याने रस्ता निर्माण करू नये असा तुर्ततूर्त मनाई हुकूम मिळण्याची मागणी केली आहे.

८. प्रतिवादींतर्फे असा युक्तीवाद करण्या आला आहे की, मुळातच महाशय तहसिलदार यांना मामलेदार कोर्ट ॲक्ट, १९०६ प्रमाणे सदरचा आदेश केला असून त्या कायदयाचे कलम २३(२) प्रमाणे वादीला या न्यायालयात दावा दाखल करता येवू शकत नाही. महाशय उप-विभागिय अधिकारी यांचा आदेशदेखील योग्य आहे. महसूल अधिका-यांनी प्रत्यक्ष जागेवर जावून तसा आदेश केलेला आहे. गट क्र. १९२३ च्या उत्तरेकडून पूर्वीपासून रस्ता होता. असे असतांनादेखील वादी विनाकारण रस्त्याने येणे जाण्यास हरकत अडथळा करीत आहे. वादीने विनाकारण वाद देखील केले असून त्या सदंर्भात पोलीस ठाण्यात तक्रारीदेखील प्रलंबित आहेत. त्यामुळे वादीचा अर्ज रद्द करण्याची मागणी त्यांनी केलेली आहे.

९. दोन्ही वकिलांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला. मुळात मामलेदार कोर्ट ॲक्ट, १९०६ प्रमाणे वहिवाट केस चालल्याचे वादीने कथन केले असून अशाप्रकारचे वहिवाट केस चाविण्याचे अधिकार मामलेदार यांना नाही असे वादीचे कथन नाही. मामलेदार कोर्ट ॲक्ट, १९०६ चे कलम ५ ते २२ मध्ये सविस्तर प्रक्रिया दिलेली असून योग्य तो निर्णय घ्यावा यासाठी मामलेदार यांना दिवाणी न्यायालयापेक्षा खचितच जास्त अधिकार दिलेले असून प्रत्यक्ष जागेवर जावून चौकशी करण्याचेदेखील त्यात अधिकार आहेत. सदर कायदयाचे कलम २३ प्रमाणे सदर आदेशाविरूध्द अपिल दाखल करता येवू शकत नाही. किंबहूना, केवळ महाशय जिल्हाधिकारी यांनाच फेरतपासणी करण्याचे अधिकार देण्यात आलेले असून त्या आदेशात योग्य ते बदल करण्याचे अधिकार देखील जिल्हाधिकारी अथवा त्यांचे सहाय्यक उप-जिल्हाधिकारी यांना देण्यात आलेले आहे.

१०. स्वाभाविकच, वादीचे अपिल हे महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, १९६६ चे कलम २४६ ते २५९ अन्वये महाशय उप-विभागिय अधिकारी यांच्याकडे चालू शकते. तथापि, प्रस्तुतचा दावा हा वादीने कलम १४३(४) अन्वये दाखल केल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट होते. स्वाभाविकच, त्या कायदयाचे प्रकरण ९ मध्ये सिमा व सिमा चिन्हांबाबत वाद असल्यास कलम १३२ ते १४६ अन्वये महसूली अधिका-यांसमोर सदरची प्रकरणे चालतात व कलम १४३(४) प्रमाणे त्या आदेशापासून एक वर्षाच्या आत वादीला दिवाणी दावा दाखल करता येवू शकतो. महाशय तहसिलदार यांनी दि. २९/०३/२०१७ रोजी वहिवाट केसचा निकाल दिलेला असून वादीने मुदतीत दावा दाखल केलेला आहे.

११. वादीने महाशय तहसिलदार अथवा उप-विभागिय अधिकारी यांच्या आदेशात कुठली चुक आहे ते स्पष्ट केलेले नाही. वादीच्या कथनानुसार गट क्र. १९२३ मध्ये उत्तर बांधालगत वादीची विहिर व घर आहे. तथापि, ही बाब निश्चितपणे गुणदोषांवर विचारात घेण्यास महाशय तहसिलदार व उप-विभागीय अधिकारी हे सक्षम आहेत. महाशय तहसिलदार यांचा दि. २९/०३/२०१७ मधिल आदेशामध्ये त्या बाबीचा विचार करण्यात आलेला असून त्यांनी असे नमुद केले आहे की, ''स्थळ निरीक्षणाच्यावेळी मौजे धोंडगव्हाण-शिंदवळ शिव रस्त्यापासून गट क्र. १९२३ च्या उत्तर बाजूने रस्ता सुरू असून पूर्वेला गट क्र. १९३२ च्या उत्तर बाजूनेसुद्धा रस्ता सूरू आहे, तथापि, गट क्र. १९२३ मधिल विहिरीच्या पूर्वेला गट क्र. १९२३ च्या उत्तर

बांधालगत मका पिकांची लागवड केलेली आहे. सदर मका पिक हे दोन्ही बाजूला चालू असलेल्या रस्त्याच्या रूंदीच्या क्षेत्रामध्ये व रस्त्यामध्ये अडथळा करण्याच्या हेतूने प्रतिवादींनी केले असल्याचे स्थळ निरीक्षणात आढळून आलेले आहे'' या सर्व बाबी एकाअर्थाने महाशय तहसिलदार यांनी गुणदोषांवर निकाली केले असून दिवाणी न्यायालयापेक्षा प्रत्यक्ष जागेवर जावून व मागिल रेकॉर्ड पाहून योग्य निर्णय देण्याचे अधिक अधिकार असल्यामुळे त्यांनी दिलेला निर्णय कसा चुकिचा आहे हे देखील वादीने कथन केलेले नाही. किंबहूना, त्या विहिरीच्या बाजूमधून रस्ता असल्याचे बाब देखील स्पष्ट होते. तशाच प्रकारचे निरीक्षण महाशय उप-विभागिय अधिकारी यांनी रिव्हीजन अर्ज क्र. ३०/२०१७ मध्ये नोंदविलेला आहे. गट क्र. १९२३ चा मोठा भाग प्रतिवादींच्या ताब्यात असून शिंदवड-धोंडगव्हाण रस्त्याला जाण्यासाठी अत्यंत फिरून पर्यायी रस्त्याचा वापर करण्यापेक्षा गट क्र. १९२३ च्या उत्तर भागातून मार्ग/रस्ता अत्यंत जवळचा व कमी खर्चीक असा प्रथमदर्शनी दिसतो. पूर्वी एकच मार्ग असल्यामुळे त्या रस्त्याचा वापर करणे स्वाभाविक होते, तथापि मालकी हक्क बदलला म्हणून रस्त्याच्या वहिवाटीला हरकत अडथळा करणे योग्य ठरत नाही. वादीने परिशिष्ट मध्ये नकाशा दाखल केला असून त्या नकाशावरदेखील उपरोक्त बाब स्पष्ट होते. वादीने कुठलेही असे विशेष कारण नमुद केले नाही की, ज्यामुळे महाशय तहसिलदार अथवा उप-विभागिय अधिकारी यांचा आदेश अन्यायकारक अथवा चुकिचा वाटेल. किंबहुना, स्वतंत्रदेखील असा कुठलाही मुद्दा उपस्थित केलेला नाही की ज्याचा विचार पूर्वी केलेला नाही.

१२. उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे वादीला महसूल विभागात योग्य ती दाद मागण्याचा पूर्ण अधिकार उपलब्ध आहे. अशापरिस्थितीत महाशय तहसिलदार व उप-विभागिय अधिकारी यांनी दिलेल्या गुणदोषांवरील आदेशाला स्थगिती दिल्यास प्रतिवादींचे अपरिमित असे नुकसान होण्याची शक्यता आहे. वादी हा स्वच्छ हाताने न्यायालयासमक्ष आलेला नाही. त्यामुळे **वादबिंदू क्र. १ ते ३** चे उत्तर मी **नकारार्थी** देत आहे.

१३. वादीतर्फे नामदार उच्च न्यायालय, मुंबई याचेकडील न्यायनिर्णय ***जगलाल प्रेमलाल जयस्वाल व इतर विरूध्द वामन शामरावजी ढोबळे व इतर २००८(४) ऑल एमआर ३३५*** दाखल करण्यात आला असून त्यात महाराष्ट् जमिन महसूल संहिता चे कलम १४३ चा उहापोह करण्यात आला असून दिवाणी न्यायालयाला तसा दावा दाखल करण्यात अधिकारी असल्याचे धरण्यात आलेले आहे. स्वाभाविक, वादीचा दावा हा या न्यायालयात

मेन्टेनेबल असल्याचेदेखील उपरोक्त निष्कर्षात धरण्यात आलेले आहे.

**<u>वादबिंदु क्र. ४ करीता</u>** -

१४. उपरोक्त कथनाप्रमाणे वादीना मनाई हुकूम न दिल्यास त्याचे फारसे नुकसान होणार नाही व दाव्याची गुंतागुंत वाढू शकते. त्यामुळे सदरचा अर्ज रद्द होणे आवश्यक असून स्वभाविकच सदरचा अर्जाचा खर्च मुळ दाव्यात समाविष्ट होणे योग्य ठरणार आहे. त्यामुळे **वादविंदु क्र. ४** करीता खालील आदेश पारित करत आहे.

**<u>आदेश</u>**

१. वादीचा अर्ज **निशाणी क्र. ५** रद्द करण्यात येत आहे.

२. अर्जाचा खर्च मुळ दाव्यात समाविष्ट करण्यात यावा.

दिनांक - ०२/०५/२०१८

(**के. जी. चौधरी**)
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, चांदवड.